
ePaper केंद्रीय अर्थमंत्री आज अंतरिम अर्थसंकल्प मांडणार, निवडणुकीआधी मिनी बजेट




| वर्ष - 7 | अंक - 261 | UDYAM-MH-26-0158827 |

महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## आतील पानांत


- दुसऱ्या कसोटीपूर्वी भारतासमोर पेच
- क्रितीच्या रोमान्सची चर्चा
- सोरेन यांना ईडीकडून अटक
- जरांगे पाटील उपोषणाला बसणार


www.mahaenews.com | गुरुवार, दिनांक 01 फेब्रुवारी 2024 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

## तब्बल 550 कोटी रुपयांच्या कर्जासाठी प्रस्ताव

# श्रीमंत महापालिका कर्जबाजारी!




## » शहरवासीयांच्या डोक्यावर कर्जाचा भार?

। पिंपरी ।महाईन्यूज ।।

**आशिया खंडातील श्रीमंत महापालिका असा लौकिक असलेली पिंपरी-चिंचवड महापालिकेचे प्रशासन मोशी रुग्णालय आणि पुणे-मुंबई महामार्गाच्या सुशोभीकरणासाठी कर्ज काढणार आहे. 550 कोटींच्या कर्जासाठी महापालिकेने बँकांकडून प्रस्ताव मागवले आहेत. त्यामुळे शहरवासीयांच्या डोक्यावर आता कर्जाचा भार पडणार आहे.**

पिंपरी-चिंचवड महापालिकेतील नगरसेवकांची सदस्यांची मुदत 12 मार्च 2022 ला पूर्ण झाल्याने प्रशासकीय राजवट सुरू आहे. महापालिकेचा अर्थसंकल्प केंद्राच्या योजनांसह सुमारे साडेसात हजार कोटींचा आहे. त्या माध्यमातून दरवर्षी विकास प्रकल्प राबविले जातात. आजपर्यंत विविध योजनांसाठी कर्जरोखे घेतले जात होते. मात्र, आता थेट कर्ज काढण्याची तयारी सुरू आहे. महापालिकेच्या वतीने शहरात हरित रुग्णालयांची उभारणी करणे आणि महामार्गाचे सुशोभीकरण करण्याचे नियोजन सुरू आहे. पुणे-मुंबई महामार्ग आणि टेल्को रस्त्याचे सुशोभीकरण करण्यात येणार आहे. महागार्वर पादचारी मार्ग, सायकल ट्रॅक उभारण्यात येणार आहे. त्या संदर्भातील नोटीस प्रसिद्ध करण्यात आली आहे. विविध बँकांकडून कमी व्याजदराने मुदत कर्ज घेण्यात येणार आहे. सुमारे 12 ते 15 वर्षे कालावधीसाठी कमी व्याजदराने कर्ज मिळविण्यासाठी बँकांना आवाहन केले आहे. कमी दर मिळाल्यास बँक आणि कर्ज घेण्याची निश्चिती करण्यात येणार आहे.

### प्रशासकीय राजवटीत कर्ज घेण्यावर भर

» महापालिकेमध्ये लोकप्रतिनिधी असताना कोणत्याही विषयावर सुरुवातीला स्थायी समिती, त्यानंतर विविध विषय समित्या तसेच सर्वसाधारण सभेत चर्चा होते. त्यानंतर तो विषय मंजूर करून त्यावर अंमलबजावणी केली जाते. मात्र, प्रशासकीय राजवट सुरू असल्याने सर्वसाधारण सभा आणि स्थायी समितीचे निर्णय प्रशासनच घेते. आयुक्तांनी विषय मांडल्यानंतर प्रशासक म्हणून तेच विषय मंजूर करतात. प्रशासकीय राजवटीत कर्जाचा विषय रेटून नेण्याचा प्रयत्न सुरू आहे.

## निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर ‘पोलीस डिप्लोमसी’

## » शहरात एकाचवेळी 27 पोलीस निरीक्षकांच्या बदल्या

। पिंपरी ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**आगामी लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पिंपरी चिंचवड शहरातील २७ पोलीस निरीक्षकांच्या बदल्या झाल्या आहेत. तसेच राज्याच्या विविध भागामधून २४ पोलीस निरीक्षक पिंपरी चिंचवड शहरात आले आहेत.**




स्वग्राम जिल्ह्यात नेमणुकीस असलेले पोलीस अधिकारी व ३० जून २०२४ पर्यंत किंवा त्यापूर्वी चार वर्षांपैकी तीन वर्ष कार्यकाल पूर्ण झालेल्या अधिकाऱ्यांच्या बदल्या करण्यात आल्या आहेत. बदलीवर हजर झालेल्या पोलीस निरीक्षकांना घटकांतर्गत पदस्थापना देताना त्यांची मूळ जिल्ह्यात नेमणूक झाली असेल तर कार्यकारी पद देता येणार नसल्याचे बदली आदेशात म्हटले आहे. विशेष पोलीस महानिरीक्षक (आस्थापना) के एम मल्लिकार्जुन प्रसन्ना यांनी मंगळवारी (दि.३०) बदलीचे आदेश दिले आहेत.

**‘या’ पोलीस अधिकाऱ्यांच्या येथे बदल्या झाल्या..**

अजित लकडे (सोलापूर शहर), शिवाजी गवारे (ठाणे शहर), सुनील गोडसे (नागपूर शहर), शंकर डामसे (ठाणे शहर), शैलेश गायकवाड (नागपूर शहर), दिलीप शिंदे (सोलापूर शहर), शंकर बाबर (ठाणे शहर), ज्ञानेश्वर साबळे (ठाणे शहर), रणजीत सावंत (नागपूर शहर), दिपाली धाडगे (नागपूर शहर), प्रसाद गोकुळे (नागपूर शहर) सुनील पिंजन (नागपूर शहर), रामचंद्र घाडगे (नागपूर शहर), विश्वजीत खुळे (नागपूर शहर), मच्छिंद्र पंडित (नागपूर शहर), बाळकृष्ण सावंत (नागपूर शहर), प्रकाश जाधव (नागपूर शहर), दीपक साळुंखे (ठाणे शहर), शहाजी पवार (सोलापूर शहर), किशोर पाटील (नागपूर शहर), सुनील तांबे (ठाणे शहर), रूपाली बोबडे (नागपूर शहर), अरविंद पवार (नागपूर शहर), युनूस मुलानी (नागपूर शहर), अनिल देवडे (छत्रपती संभाजी नगर शहर), दशरथ वाघमोडे (गडचिरोली), सोन्याबापू देशमुख (नागपूर शहर)

### ‘हे’ नवीन पोलीस अधिकारी आले...


» अमोल फडतरे (डीआयजी गडचिरोली), संदीप पाटील (गडचिरोली), वैजयंती मांडवधरे (नागपूर शहर), विश्वनाथ चव्हाण (नागपूर शहर), विनोद चौधरी (नागपूर शहर), बापू ढेरे (नागपूर शहर), दीपक गोसावी (नागपूर शहर), प्रवीण कांबळे (नागपूर शहर), प्रदीप राईनवर (नागपूर शहर), अमित डोळस (नागपूर शहर), संग्राम शेवाळे (नागपूर शहर), अमोल देशमुख (नागपूर शहर), राजेंद्रकुमार सानप (नागपूर शहर) गणेश जामदार (नागपूर शहर), नितीन फटांगरे (नागपूर शहर), बबन येडगे (नागपूर शहर), भारत शिंदे (नागपूर शहर), ऋषिकेश घाडगे (नागपूर शहर), भीमा नारके (नागपूर शहर), भारत कराडे (नागपूर शहर), गोरख कुंभार (नागपूर शहर), विजयकुमार वाकसे (अमरावती शहर), मालोजी शिंदे (ठाणे शहर), धनंजय कापरे (ठाणे शहर).

# जातीव्यवस्था टिकावी आरक्षण संपवावे!

## करवीर पीठाचे शंकराचार्य विद्यानृसिंह भारती यांचे वक्तव्य

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**सर्वांच्या कल्याणासाठी जातीव्यवस्था टिकावी मात्र आरक्षण संपवावे असे करवीर पीठाचे शंकराचार्य विद्यानृसिंह भारती स्वामी शंकराचार्य यांनी म्हटले. चुकीच्या वापरांमुळे जातीव्यवस्था वाईट ठरली असा दावा त्यांनी केला. शंकराचार्यांच्या या वक्तव्यामुळे वाद होण्याची शक्यता आहे. श्री गंगाधर स्वामी महाराज यांच्या पुण्यतिथीनिमित्त डीएम फाउंडेशनतर्फे पुण्यात आयोजित सप्ताहाचे व व्याख्यानमालेचे उद्घाटन शंकराचार्य यांच्या हस्ते झाले.**




'जात असावी की नसावी' या व्याख्यानमालेत बोलताना शंकराचार्यांनी धर्मशास्त्र, जातीव्यवस्था, समाजातील अनिष्ट चालीरीती यावर त्यांची मत मांडली. त्यांनी म्हटले की, जातीव्यवस्था सर्वांच्या कल्याणासाठी आहे. मात्र, अनेकांनी स्वार्थासाठी चुकीच्या पद्धतीने जातिव्यवस्थेचा वापर केला. त्यामुळे धर्मशास्त्र आणि समाजव्यवस्थेचे महत्वाचे अंग असलेली जातीव्यवस्था वाईट ठरली. मानवाच्या कल्याणासाठी जातीव्यवस्था टिकवणे आणि योग्य पद्धतीने त्याचे अनुकरण करणे समाज व देशहिताचे आहे," असे करवीर पीठाचे शंकराचार्य विद्यानृसिंह भारती स्वामी यांनी म्हटले. टिळक मार्गावरील मराठा चेंबर ऑफ कॉमर्सच्या सभागृहात झालेल्या कार्यक्रमात ब्राह्मण महासंघाचे आनंद दवे, पत्रकार दत्ता जाधव, फाउंडेशनचे विजय देशमुख महाराज यांनी देखील विचार मांडले. या प्रसंगी

शंकराचार्य म्हणाले, "समाज सुशिक्षित होतोय; मात्र सुसंस्कृतपणा विसरत चालला आहे. सनातन वैदिक संस्कृतीने मानवाच्या कल्याणासाठी जातीव्यवस्थेचे महत्व अधोरेखित केले आहे. धर्मशास्त्राचे पालन न केल्याने अनेक समस्या उद्भवल्या आहेत. आपण हक्क मागतो; पण कर्तव्य सोयीस्कर विसरतो. जात घालवण्याचा प्रयत्न करतो, तेव्हा ती अधिक प्रभावी होत जाते. जातिव्यवस्थेचे कवच असल्यानेच ब्रिटिशांना धर्म फोडता आला नाही. आरक्षण व्यवस्था सर्वांसाठी घातक आहे. समाजाची घडी चांगली राहण्यासाठी जातिव्यवस्था टिकवली पाहिजे असं त्यांनी म्हटले. आनंद दवे म्हणाले, "गेल्या सहा महिन्यात जातीय वातावरण अधिक गडद झाले. जातीचा उपयोग करून राजकारण्यांनी समाजाची केलेली विभागणी लोकशाहीला मारक आहे. आरक्षणाला विरोध करणारे मनोज जरांगे आज आरक्षणासाठी आरपारची लढाई करत आहेत. सध्याच्या भूमिकेने भविष्यात मराठा अस्तित्वात राहिल की नाही, याची शंका वाटते. गुणवत्तेला आरक्षणाचा पर्याय अयोग्य असून, जात घालवण्यासाठी आरक्षण रद्द केले पाहिजे अशी मागणी दवे यांनी केली. जातीच्या भांडणात धर्माचे मोठे नुकसान होते. हिंदू धर्माच्या नावावर एकत्रित आलेला समाज फोडण्याचे काम जातीयवादी लोक करतात, हे दुर्दैवी असल्याचे मत त्यांनी व्यक्त केले. दत्ता जाधव म्हणाले, "जात नसावी, असे आपण म्हणतो. मात्र, स्वार्थासाठी जातीचे अस्त्र वापरतो. राजकीय नेत्यांनी जातीच्या उतरंडी अधिक मजबूत केल्या आहेत. शिक्षणामुळे जातीच्या चौकटी दूर व्हायला हव्या; मात्र राजकीय गणिते जुळवण्यासाठी जातीचे समीकरण केले जाते. त्यातून जात अधिक स्पष्टपणे पुढे येते. गेल्या काही काळात जाती-जातीतील रेषा अधिक ठळक होत आहेत." विजय देशमुख महाराज म्हणाले, "जातींअंताचा लढा अनेक वर्षांपासून सुरु आहे. जात संपवण्यासाठी सर्वांनी एकत्रित प्रयत्न करायला हवेत. माणूस म्हणून जगण्याची आणि समाजाला एकसंध ठेवण्याची गरज असताना जातीच्या नावावर होणार अवडंबर अयोग्य आहे. जात नसावी, यासाठी काम करायला हवे.

### धर्माचे पालन न केल्याने समस्या

देशमुख महाराज फाउंडेशनच्या माध्यमातून मानवता धर्म जनमानसात रुजवण्यासाठी प्रयत्नशील आहोत, असेही त्यांनी म्हटले. 'जात असावी की नसावी' या व्याख्यानमालेत बोलताना शंकराचार्यांनी धर्मशास्त्र, जातीव्यवस्था, समाजातील अनिष्ट चालीरीती यावर त्यांची मत मांडली. त्यांनी म्हटले की, जातीव्यवस्था सर्वांच्या कल्याणासाठी आहे. मात्र, अनेकांनी स्वार्थासाठी चुकीच्या पद्धतीने जातिव्यवस्थेचा वापर केला. त्यामुळे धर्मशास्त्र आणि समाजव्यवस्थेचे महत्वाचे अंग असलेली जातीव्यवस्था वाईट ठरली. टिळक मार्गावरील मराठा चेंबर ऑफ कॉमर्सच्या सभागृहात झालेल्या कार्यक्रमात ब्राह्मण महासंघाचे आनंद दवे, पत्रकार दत्ता जाधव, फाउंडेशनचे विजय देशमुख महाराज यांनी देखील विचार मांडले.सनातन वैदिक संस्कृतीने मानवाच्या कल्याणासाठी जातीव्यवस्थेचे महत्व अधोरेखित केले आहे. धर्मशास्त्राचे पालन न केल्याने अनेक समस्या उद्भवल्या आहेत.


# शरद मोहोळ हत्या प्रकरणातील मुख्य आरोपी सापडला

## पुणे पोलिसांनी नाशिकमधून पाठलाग करत केली अटक

। पुणे ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**गँगस्टर शरद मोहोळ हत्या प्रकरणात पुणे पोलिसांना मोठे यश मिळाले आहे. शरद मोहोळ हत्या प्रकरणातील मुख्य आरोपी गणेश मारणे याच्यासह तिघांना पुणे पोलिसांनी थरारक पाठलाग करून पकडले. गणेश मारणे हा शरद मोहोळ हत्या प्रकरणातील मुख्य आरोपी असून तो गेल्या अनेक दिवसांपासून फरार होता. पुणे पोलीस गुन्हे शाखेने नाशिक रोड येथून अटक केली.**

मोहेळ हत्याप्रकरणातील मुख्य सुत्रधार गणेश मारणे, विठ्ठल शेलार यांच्यासह 16 जणांवर मोक्का लावण्यात आला.पुण्यातील कुख्यात गुंड शरद मोहोळची 5 जानेवारी रोजी दिवसाढवळ्या गोळ्या झाडून हत्या करण्यात आली. या घटनेने पुण्यासह राज्यात एकच खळबळ उडाली होती. शरद मोहोळ हत्या प्रकरणात 20 हून अधिकजणांना अटक करण्यात आली आहे. शरद मोहोळची हत्या झाल्यानंतर काही तासांमध्ये सात जणांना अटक करण्यात आली. त्यानंतर 15 जानेवारी रोजी पुणे पोलीसांच्या गुन्हे शाखेने शरद मोहोळ हत्या प्रकरणात दहा जणांना पनवेल आणि वाशीमधून अटक केली. विठ्ठल शेलार, रामदास उर्फ वाघ्या मारणे यासह दहा जणांना गुन्हे शाखेच्या पथकाने छापा टाकून




अटक केली होती. आतापर्यंत मुन्ना पोळेकर हा मुख्य आरोपी असल्याचे मानले जात होते. पोळेकरने इतर साथीदारांसोबत या हत्तेचा कट रचल्याचे प्राथमिक तपासातून समोर आले होते. मात्र, पोलीस तपासात अनेक गोष्टी समोर आल्यानंतर अनेकजण पोलिसांच्या रडारवर आले आहेत. पुणे पोलिसांनी आज नाशिकमधून या प्रकरणातील मुख्य आरोपी असलेला गणेश मारणे याला अटक केली आहे. पुणे पोलिसांच्या गुन्हे शाखेने शरद मोहोळ हत्येप्रकरणी जवळपास 24 जणांच्या मुसक्या आवळल्या आहेत. साहिल उर्फ मुन्ना संतोष पोळेकर, नामदेव महिपती कानगुडे, अमित उर्फ अमर मारुती कानगुडे, चंद्रकांत शाहू शेळके, विनायक संतोष गव्हाणकर, विठ्ठल किसन गांदले, ॲड. रवींद्र पवार, ॲड. संजय उडान, विठ्ठल शेलार, रामदास उर्फ वाघ्या मारणे, धनंजय मारुती वटकर, सतीश संजय शेडगे, नितीन अनंता खैरे, आदित्य विजय गोळे, संतोष दामोदर कुरपे यांना बेड्या ठोकल्या आहेत.

### आधीच 24 जणांना अटक

शरद मोहोळच्या लग्नाचा वाढदिवशी त्याच्या आयुष्याची दोरी कापली गेलीय. शरद मोहोळ जेव्हा घरातून बाहेर पडला तेव्हा विठ्ठल गांडले, नितीन कानगुडे आणि साहील पोळेकर हे त्याचे साथीदार बॉडीगार्ड म्हणून त्याच्यासोबत चालायला लागले. सुतारदरा भागातील घरातून बाहेर पडलेला शरद मोहोळ काही पावले चालला असेल तोच याच साथीदारांनी त्याच्यावर गोळ्या झाडायला सुरुवात केली. तिघांनी त्यांच्याजवळील पिस्तुलातून झाडलेल्या गोळ्यांपैकी दोन गोळ्या शरद मोहोळच्या मानेत लागल्या, एक छातीत तर एक गोळी शरद मोहोळच्या डोक्यात लागली. काही कळायच्या आत पुण्याच्या गुन्हेगारी विश्वात गेली दीड दशके दहशत असलेला शरद मोहोळ रक्ताच्या थारोळ्यात पडला.

# आकुर्डीत साकारणार वारकरी भवन!

## महापालिका आयुक्तांचे आश्वासन : भाजपा शहराध्यक्ष शंकर जगताप यांचा पुढाकार

। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पिंपरी-चिंचवड महापालिका प्रशासनाच्या माध्यमातून आकुर्डी येथील आषाढ वारी मुक्कामाच्या परिसरात भव्य वारकरी भवन उभारण्यात येणार आहे. तसेच, वारकऱ्यांसाठी सर्व सोयी-सुविधा उपलब्ध करण्यात येईल, असे आश्वासन महापालिका आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी दिले आहे.**



महाराष्ट्र वारकरी महामंडळातील सर्व पदाधिकारी व सदस्य यांच्या वतीने पिंपरी-चिंचवड महापालिकेचे आयुक्त शेखर सिंग यांची भेट घेण्यात आली. यावेळी देहु देवस्थान संस्थानचे अध्यक्ष ह.भ.प.पुरुषोत्तम महाराज मोरे (इनामदार), माजी अध्यक्ष ह.भ.प. नितिन महाराज मोरे (इनामदार), भंडारा डोंगर ट्रस्टचे अध्यक्ष ह.भ.प. बाळासाहेब काशिद पाटील, भाजपा शहराध्यक्ष शंकर जगताप, माजी उपमहापौर शैलजा मोरे, माजी नगरसेवक आप्पासाहेब बागल तसेच निगडी खंडोबा देवस्थानचे अध्यक्ष तानाजी काळभोर, माजी सत्तारुढ पक्षनेते नामदेवराव ढाके, माजी नगरसेवक सुरेश भोईर, देहु देवस्थान संस्थानचे विश्वस्त ह.भ.प विशाल महाराज मोरे ( इनामदार), ह.भ.प विजयभाऊ गायकवाड, माऊली भाडाळे, किशोर पाटील, सत्पाल ढोरे, खंडोबा देवस्थानचे उपाध्यक्ष सोमनाथ काळभोर, खजिनदार जंगलीमहाराज काळभोर व कार्याध्यक्ष शंकर काळभोर आदी उपस्थित होते.

यावेळी आषाढी वारी वेळी संत तुकाराम महाराज पालखी सोहळ्याचा पहिला मुक्काम विठ्ठल वाडी, आकुर्डी येथे असतो. या पालखी सोहळ्यातील वारकरी, पदाधिकारी, विणेकरी, महाराज मंडळी तसेच महिला भगिणी यांना राहण्यासाठी पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने या परिसरात प्रशस्त असे वारकरी भवन उभारण्यात यावे अशी मागणी करण्यात आली.

> संत तुकाराम महाराज पालखी सोहळ्याचा पहिला मुक्काम विठ्ठल वाडी, आकुर्डी येथे असतो. या ठिकाणी प्रशस्त वारकरी भवन उभारावे, अशी वारकऱ्यांची मागणी आहे. तसेच, मेट्रोच्या पीलरवर संत, वारकऱ्यांच्या प्रतिमा साकारण्यासाठी लोकनेते आमदार स्व. लक्ष्मण जगताप यांनीही पुढाकार घेतला होता. यासह श्री खंडोबा देवस्थान पालखी विसाव्याच्या ठिकाणी सोयी-सुविधा उपलब्ध करण्याबाबत आयुक्त शेखर सिंह यांनी सकारात्मक आश्वासन दिले आहे. त्याची अंमलबजावणी व्हावी, अशी अपेक्षा आहे.
> **- शंकर जगताप,** शहराध्यक्ष, भाजपा, पिंपरी-चिंचवड.

### आयुक्तांचा सकारात्मक प्रतिसाद...

» तसेच, श्री संत श्रेष्ठ तुकाराम महाराज पालखी सोहळा पंढरपूर वरुन देहु कडे येत असताना पालखी सोहळा निगडी येथील श्री खंडोबा मंदिराच्या प्रांगणात विसाव्या साठी दोन ते तीन तास थांबत असते. या दिवशी पालखी सोहळ्या बरोबर 4 ते 5 हजार वारकरी असतात व परिसरातील 5 ते 6 हजार भाविक भक्त पालखी सोहळ्याचे दर्शन घेण्यासाठी येत असतात. यासह खंडोबाची यात्रा ज्या दिवशी असते अशा दोन्ही कार्यक्रमाच्या दिवशी पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने मंदीर परिसरात मंडप, कमान, स्टेज, स्पीकर्स इत्यादी व्यवस्था करावी, अशी मागणी करण्यात आली. याला आयुक्तांनी सकारात्मक प्रतिसाद दिला आहे.

# पुणे-लोणावळा लोकल पुन्हा धावली

## रेल्वे राज्यमंत्री रावसाहेब दानवे, खासदार श्रीरंग बारणे यांनी दाखविला हिरवा झेंडा

। पिंपरी ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**कोरोना महामारीनंतर दुपारच्या वेळेत बंद झालेली पुणे-लोणावळा लोकल अखेर बुधवारपासून पुन्हा धावण्यास सुरुवात झाली. केंद्रीय रेल्वे राज्यमंत्री रावसाहेब दानवे आणि यासाठी सातत्याने पाठपुरावा करणारे मावळचे शिवसेना खासदार श्रीरंग बारणे यांनी दिल्लीतून हिरवा झेंडा दाखविला. लोकल सुरू झाल्याने प्रवाशांनी आनंद व्यक्त करत खासदार बारणे यांचे आभार मानले.**



लोणावळा रेल्वे स्थानक येथे उद्घाटन सोहळा झाला. राज्यमंत्री दानवे आणि खासदार बारणे दिल्लीतून सहभागी झाले होते. मंडल रेल प्रबंधक इंदू दुबे यांच्यासह रेल्वेचे अधिकारी स्थानकावर उपस्थित होते

रेल्वे राज्यमंत्री रावसाहेब दानवे म्हणाले की, कोरोना साथीच्या कालावधीत रेल्वेची सेवाच बंद करण्यात आली होती.

कोरोनाचा प्रादुर्भाव कमी झाल्यानंतर टप्प्या-टप्प्याने रेल्वे सुरू केल्या. पुणे-लोणावळा दरम्यान दुपारच्या वेळेत लोकल गाड्यांचे संचालन करण्यासाठी खासदार श्रीरंग बारणे हे सातत्याने पाठपुरावा करत होते. रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव, माझ्याकडे आणि अधिकाऱ्यांकडे त्यांचा सतत पाठपुरावा सुरू होता. आजपासून दुपारच्या वेळेत लोकल धावण्यास सुरुवात झाली आहे.

### कोणार्क एक्स्प्रेसला लोणावळा-कर्जतला थांबा

» पुणे-लोणावळा मार्गावर दुपारच्या वेळेत लोकल धावण्यास सुरुवात झाली आहे. नागरिकांच्या सोयीनुसार लोकलच्या दुपारच्या वेळा निश्चित केल्या जातील. कोणार्क एक्स्प्रेसला लोणावळा-कर्जत स्थानकावर थांबा दिला जाणार आहे. त्याचबरोबर आणखी लांब पल्ल्याच्या गाड्यांना थांबा देण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. मावळ मतदारसंघात विविध पर्यटन स्थळे आहेत. त्यामुळे मावळात येणाऱ्या प्रवाशांची संख्या मोठी असते. प्रवाशांसाठी रेल्वे स्थानकावर विविध सोयी सुविधा निर्माण केल्या जाणार आहेत. चिंचवड, आकुर्डी, देहूरोड, तळेगावदाभाडे या चार रेल्वे स्थानकाचा अमृत भारत रेल्वे स्टेशन योजने अंतर्गत समावेश झाला आहे. पहिल्या टप्प्यात आकुर्डी, तळेगाव दाभाडे या रेल्वे स्थानकाचा विस्तार, सुशोभीकरण होत असून काम प्रगतीपथावर असल्याचे खासदार श्रीरंग बारणे यांनी सांगितले.



# संस्कृतीचा स्वीकार करण्याचा सल्ला




**सर्वोच्च न्यायालयाच्या अमृत महोत्सवी वर्धापनदिन समारंभात एकीकडे सरन्यायाधीश डॉ. धनंजय चंद्रचूड यांनी न्यायपालिकेने आपल्या पारंपरिक कामकाजाच्या पद्धतीत बदल करून व्यावसायिक संस्कृतीचा स्वीकार करण्याचा सल्ला दिला.**

न्यायाधीश भूषण गवई यांनी नुकतेच सुनावले. अर्थात न्यायपालिकेतील अधिकाऱ्यांना त्यांच्या वरिष्ठांनी सुनावण्याची ही पहिलीच वेळ नाही. गेल्या ऑगस्टमध्ये उच्च न्यायालय हे सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाच्या विरोधात आदेश देऊ शकत नाही, अशा कडक शब्दांत सर्वोच्च न्यायालयाने गुजरात उच्च न्यायालयाला ठणकावले होते. गुजरातमधील न्यायाधीशांच्या कार्यपद्धतीबद्दल सर्वोच्च न्यायालयाने नापसंती व्यक्त केलेली असतानाच पश्चिम बंगाल उच्च न्यायालयात दोन वेगवेगळे न्यायमूर्ती परस्परांच्या आदेशांना स्थगिती देत असल्याचा पोरखेळ सुरू होता. शेवटी सर्वोच्च न्यायालयाला त्यात हस्तक्षेप करावा लागला.गुजरातमध्ये न्यायपालिकेचे कामकाज कसे चालते यासंदर्भात सर्वोच्च न्यायालयात आलेले एक प्रकरण फारच बोलके आहे. एका उद्योगपतीला सर्वोच्च न्यायालयाने गेल्या डिसेंबरमध्ये अटकपूर्व जामीन मंजूर केला होता. तरीही गुजरात पोलिसांनी त्या उद्योगपतीला अटक



केली आणि न्यायदंडाधिकाऱ्यांनी त्याला पोलीस कोठडी सुनावली. आरोपीच्या वकिलाने सर्वोच्च न्यायालयाच्या अटकपूर्व जामिनाची कागदपत्रे सादर केलेली असतानाही पोलीस आणि न्यायालयाने कारवाई केली. यावरून सर्वोच्च न्यायालयाचे खंडपीठ संतापले. अटकपूर्व जामीन मंजूर असतानाही आरोपीची पोलीस कोठडीत चौकशी करण्यास परवानगी देण्याच्या गुजरातमधील न्यायपालिकेच्या कार्यपद्धतीवर न्या. भूषण गवई आणि न्या. संदीप मेहता यांच्या खंडपीठाने संताप व्यक्त केला. अशा कृतीतून वैयक्तिक स्वातंत्र्याच्या अधिकारांचा उद्देश सफल होत नाही, असे निरीक्षण खंडीपाठाने नोंदविले. या खटल्यात गुजरात उच्च न्यायालयाला प्रतिवादी करण्यात आले आहे. अटकपूर्व जामीन किंवा नियमित जामीन मंजूर करण्याच्या आदेशातच चौकशी अधिकारी आरोपीच्या पोलीस कोठडीची मागणी करू शकतो ही गुजरातमधील सर्रास प्रथा असल्याचे महान्याय अभिकर्ता (सॉलिसिटर जनरल) तुषार मेहता यांनी निदर्शनास आणताच गुजरातसाठी वेगळे कायदे आहेत का, हा सवाल करत सर्वोच्च न्यायालयाने यामुळे भारतीय दंड संहितेतील अटकपूर्व जामिनासंदर्भातील ४३८ व्या कलमाचा उद्देश सफल होत नाही, असे निरीक्षण नोंदविले. याबाबतीतील 'गुजरातमधील न्यायाधीशांना योग्य प्रशिक्षण दिले जावे', हे सर्वोच्च न्यायालयाचे मत म्हणजे खरे तर गुजरातमधील न्यायपालिकेवर ओढलेले खरमरीत ताशेरेच आहेत.गेल्या ऑगस्टमध्ये सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाच्या विरोधात गुजरात उच्च न्यायालयाने आदेश दिला होता. तेव्हाही सर्वोच्च न्यायालयाने गुजरात उच्च न्यायालयाला चांगलेच तासले होते. 'देशातील कोणतेही न्यायालय सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाच्या विरोधात आदेश देऊ शकत नाही. तसे करणे हे घटनेच्या तत्त्वाच्या विरोधात असल्या'चे मत नोंदवून सर्वोच्च न्यायालयाने तीव्र नापसंती व्यक्त केली होती. आता तर गुजरातमध्ये जामिनावर दंड संहितेतील तरतुदीच्या विरोधात आदेश देण्याची प्रथाच असल्याचे समोर आले आहे. सर्वोच्च न्यायालयाने ताशेरे ओढल्यावर तरी गुजरातमधील न्यायालये दंड संहिता किंवा घटनेतील तरतुदींचे पालन करतील ही अपेक्षा. पश्चिम बंगाल उच्च न्यायालयात सुरू असलेला पोरखेळ बघून हे उच्च न्यायालय की राजकीय अड्डा, असा प्रश्न निर्माण व्हावा. वैद्याकीय प्रवेश सुलभ व्हावेत म्हणून पश्चिम बंगाल सरकारमधील उच्चपदस्थ जातीची खोटी प्रमाणपत्रे देत असल्याची याचिका सुनावणीसाठी आली असता न्या. अभिजीत गंगोपाध्याय यांनी सीबीआय चौकशीचा आदेश दिला. त्यावर दोन सदस्यीय खंडपीठाने त्याला स्थगिती दिली. यावर गंगोपाध्याय यांच्या एक सदस्यीय खंडपीठाने पुन्हा सीबीआय चौकशीचा आदेश दिला. त्याला पुन्हा द्विसदस्यीय खंडपीठाने स्थगिती दिली. गंगोपाध्याय हे भाजपचे पाठीराखे असून ते भविष्यात भाजपच्या वतीने निवडणूक लढविणार असल्याचा आरोप द्विसदस्यीय खंडपीठाचे न्या. सेन यांनी केला.

## संपादकीय »

### परीक्षा पे चर्चा!

***१ एप्रिलपासून सरकारी तिजोरीतून खर्च करण्याचा सरकारचा अधिकार संपुष्टात येतो. म्हणून ३१ मार्चच्या आत आगामी वर्षाचा अर्थसंकल्प मंजूर करवून घेतला जातो.***

अर्थसंकल्पाच्या पूर्वसंध्येस अर्थसंकल्पपूर्व आर्थिक पाहणी अहवाल सादर केला जातो. परंतु निवडणुकांमुळे यंदा अर्थसंकल्प नाही. त्याऐवजी अर्थमंत्री निर्मला सीतारामन १ फेब्रुवारीस लेखानुदान सादर करतील. त्यातून नवे सरकार येईपर्यंत सरकारला आवश्यक खर्च करण्याचा अधिकार मिळेल. तो आवश्यक कारण आर्थिक वर्ष ३१ मार्च रोजी संपते. १ एप्रिलपासून सरकारी तिजोरीतून खर्च करण्याचा सरकारचा अधिकार संपुष्टात येतो. म्हणून ३१ मार्चच्या आत आगामी वर्षाचा अर्थसंकल्प मंजूर करवून घेतला जातो. यंदा निवडणुकांमुळे ते शक्य नाही. म्हणून मग लेखानुदान. या प्रथेस २०१९ साली सरकारने मुरड घातली आणि जवळपास संपूर्ण अर्थसंकल्प सादर केला. त्यामुळे त्या वर्षी दोन अर्थसंकल्प सादर झाले. यंदाही तसे होणार नाही; असे नाही. पण तसे झाले तरी आर्थिक पाहणी अहवाल मात्र एकच असेल.

**"सुवर्णसंधी! सुवर्णसंधी!! राजकीय क्षेत्रात करिअर करू पाहणाऱ्या होतकरूंसाठी सुवर्णसंधी!!! २०१४ नंतर देशाच्या राजकारणाचा नूर पूर्णपणे पालटून गेल्याचे तुम्ही जाणताच. विविध कसरती करून ती टिकवायची कशी याचे प्रशिक्षण देण्यासाठी आमच्या 'नितीश' अकॅडमीतर्फे एका कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे.**

## देशभरात सर्वत्र 'पलटूराम' तयार झाले तर

सहभागी होऊ इच्छिणाऱ्यांसाठी अगदी वाजवी शुल्क आकारले जाईल. बिहारचे मुख्यमंत्री नितीशकुमार यांच्यापासून प्रेरणा घेत आम्ही हा उपक्रम सुरू केला. त्यांनीही त्यांचे नाव वापरण्याची संमती अतिशय आनंदाने दिली. मुळात नितीश ही एक व्यक्ती नसून प्रवृत्ती आहे व त्याचा सार्वत्रिक प्रसार होऊन ती सर्वार्थाने रूढ व्हायला हवी असा मानस त्यांनी व्यक्त केल्याने हा उपक्रम सुरू करण्यात आला.महिनाभर चालणाऱ्या या कार्यशाळेत कधी पक्ष न बदलता तर कधी बदलून सत्तेची खुर्ची कायम कशी राखायची, फारसा वादविवाद न होऊ देता सुलभ सत्तांतर कसे घडवून आणायचे, हे करताना चेहऱ्यावरचे भाव निरागस कसे ठेवायचे, यासंदर्भातील प्रत्येक कृतीला नैतिकतेची जोड कशी द्यायची, यातून समजा प्रतिमाभंगाचा धोका उद्भवलाच तर त्याचे संवर्धन कसे करायचे, सामान्य लोक तसेच माध्यमांनी 'पलटूराम' म्हटले तरी न चिडता निर्व्याज कसे हसायचे, आधी




विरोधकांविषयी केलेली वक्तव्ये नंतर त्यांनाच सोबत घेतल्यावर कशी विसरायची, त्यासंदर्भात कुणी आठवण करून दिलीच तर ऐकू न आल्याचा अभिनय कसा करायचा, पलटी मारण्याच्या प्रत्येक कृतीचे समर्थन करताना त्याला राज्य तसेच जनतेच्या हिताशी कसे जोडायचे, मागास असल्याचा आव कधी व केव्हा आणायचा, यावर मान्यवरांकडून मार्गदर्शन केले जाईल. यात सहभागी होणारा प्रत्येक होतकरू पक्ष काढू शकणार नाही. प्रत्येकालाच मुख्यमंत्री पदाची संधी मिळणार नाही याची पूर्ण कल्पना आम्हाला आहे. मात्र माननीय नितीशकुमारांनी केलेला हा ऐतिहासिक प्रयोग सत्ताकारणात समाविष्ट असलेल्या अगदी खालच्या पदापर्यंत झिरपावा हाच या कार्यशाळेमागील हेतू आहे. देशभरात सर्वत्र असे 'पलटूराम' तयार झाले तर आपसूकच या प्रवृत्तीला प्रतिष्ठा प्राप्त होईल व त्याचे जनक म्हणून नितीशकुमारांचे नाव इतिहासात अजरामर होईल. यात सहभागी होणाऱ्या होतकरूंच्या राजकीय विचाराची पाटी शक्यतो कोरी असावी.

तो समाजवादी असला तरी काही हरकत नाही. अलीकडे अस्ताला गेलेला हा विचार किमान या माध्यमातून तरी जिवंत ठेवता येईल अशी खुद्द कुमारांचीच अपेक्षा आहे. कार्यशाळेत दिवसभराच्या मार्गदर्शनानंतर सायंकाळच्या सत्रातील एक तास विविध प्रजातींचे सरडे न्याहाळण्यासाठी राखीव ठेवला जाईल. काचेच्या पेटीत ठेवलेले हे सरडे किती काळात रंग बदलतात, केशरी, पांढरा, हिरवा, पिवळा रंग त्यांच्या शरीरावर कसा उमलतो याचे निरीक्षण तुम्हाला अगदी बारकाईने करावे .

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

- संत तुकाराम

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827.
(विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# महाराजांच्या राजसदरेची पुनर्निर्मिती करा!

## संभाजीराजेंची पंतप्रधान नरेंद्र मोदींकडे मागणी

। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**अयोध्येतील वादग्रस्त बाबरी मशिदीची इमारत हटवून तिथे भव्य राम मंदिराचं बांधकाम मोठ्या वेगाने चालू आहे. दरम्यान, २२ जानेवारी रोजी या मंदिरात श्री रामाच्या मूर्तीची प्राणप्रतिष्ठा करण्यात आली. त्यापाठोपाठ आता न्यायालयाच्या निर्देशांनुसार ज्ञानवापी मशिदीच्या तळघरात हिंदूंना पूजा करता येणार आहे. तसेच मथुरेतील मशिदीविरोधातला हिंदू संघटनांचा कायदेशीर लढा तीव्र झाला आहे.**



यावरून माजी खासदार संभाजीराजे छत्रपती यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याकडे एक मागणी केली आहे. अयोध्येतील राम मंदिरात प्राणप्रतिष्ठा झाली आहे, आता रायगडावरील छत्रपती शिवाजी महाराजांच्या राजसदरेच्या कामाला हिरवा कंदील दिला जावा, अशी विनंती संभाजीराजेंनी केली आहे. यासाठी संभाजीराजेंनी थेट पंतप्रधान नरेंद्र मोदींकडे मागणी केली आहे.संभाजीराजे छत्रपती यांनी एक्स या मायक्रब्लॉगिंग प्लॅटफॉर्मवर पोस्ट केली आहे. यामध्ये त्यांनी म्हटलं आहे, श्रीरामचंद्रांच्या पवित्र जन्मभूमीवर अतिक्रमण केलेला बाबरी मशिदीचा ढाचा हटवून त्या पुण्यभूमीवर पुन:श्च श्रीरामचंद्रांची प्राणप्रतिष्ठापना झाली. आपल्या देवदेवतांच्या पवित्र स्थानांवर झालेली अशी इतरही अतिक्रमणे हटवण्याच्या दिशेने कायदेशीर पावले टाकली जात आहेत. या मार्गात अनेक अडचणी असूनही जिद्दीने लढाई लढली जात आहे. मात्र जिथे काही अडचणी नाहीत तिथे मात्र सरकारची इच्छाशक्ती कमी पडताना दिसत आहे.संभाजीराजे यांनी म्हटलं आहे की, दुर्गराज रायगडावरील छत्रपती शिवाजी महाराजांच्या राजसदरेची पुनर्निर्मिती करावी, यासाठी मागील पाच वर्षांपासून मी केंद्रीय स्तरावर पाठपुरावा करत आहे. या पुनर्निर्मितीसाठी लागणारे वास्तू अवशेषात्मक पुरावे देखील उपलब्ध आहेत. मात्र भारतीय पुरातत्त्व विभाग हे ब्रिटिशांनी केलेले नियम दाखवत कोणत्याही कामास परवानगी देत नाही. भारत सरकार ब्रिटिशकालीन प्रतीकांची नावे बदलत आहे, ब्रिटिशांनी केलेले कित्येक कायदे देखील नुकतेच बदलण्यात आले. मात्र पुरातत्व विभागाचे ब्रिटिशकालीन नियम मात्र अजूनही बदलले जात नाहीत, हे दुर्दैवी आहे.माजी खासदार म्हणाले, देव दैवतांच्या मंदिरांचे पुनरुज्जीवन केले जात आहे, ही बाब कौतुकास्पदच आहे, मात्र ज्यांनी आपल्या प्राणांची बाजी लावून देव, देश आणि धर्माचे रक्षण केले, त्या छत्रपती शिवाजी महाराजांच्या रायगडासाठी तरी किमान पुरातत्व खात्याचे नियम अपवाद करावेत, जेणेकरून शिवभक्तांना शिवकालीन रायगड अनुभवता येईल आणि संपूर्ण जगाला आपल्या इतिहासाचा हेवा वाटेल. ही मागणी घेऊन केंद्र सरकारकडे माझा पाठपुरावा सुरू आहे. यामध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी वैयक्तिक लक्ष घालून चालू असलेल्या ३५० व्या शिवराज्याभिषेक वर्षानिमित्त यावर ठोस निर्णय घ्यावा, तीच छत्रपती शिवरायांना खरी आदरांजली ठरेल.यावरून माजी खासदार संभाजीराजे छत्रपती यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याकडे एक मागणी केली आहे. अयोध्येतील राम मंदिरात प्राणप्रतिष्ठा झाली आहे, आता रायगडावरील छत्रपती शिवाजी महाराजांच्या राजसदरेच्या कामाला हिरवा कंदील दिला जावा, अशी विनंती संभाजीराजेंनी केली आहे. यासाठी संभाजीराजेंनी थेट पंतप्रधान नरेंद्र मोदींकडे मागणी केली आहे.संभाजीराजे छत्रपती यांनी एक्स या मायक्रब्लॉगिंग प्लॅटफॉर्मवर पोस्ट केली आहे.

### मागील पाच वर्षांपासून पाठपुरावा

» श्रीरामचंद्रांच्या पवित्र जन्मभूमीवर अतिक्रमण केलेला बाबरी मशिदीचा ढाचा हटवून त्या पुण्यभूमीवर पुन:श्च श्रीरामचंद्रांची प्राणप्रतिष्ठापना झाली. आपल्या देवदेवतांच्या पवित्र स्थानांवर झालेली अशी इतरही अतिक्रमणे हटवण्याच्या दिशेने कायदेशीर पावले टाकली जात आहेत. या मार्गात अनेक अडचणी असूनही जिद्दीने लढाई लढली जात आहे. मात्र जिथे काही अडचणी नाहीत तिथे मात्र सरकारची इच्छाशक्ती कमी पडताना दिसत आहे.संभाजीराजे यांनी म्हटलं आहे की, दुर्गराज रायगडावरील छत्रपती शिवाजी महाराजांच्या राजसदरेची पुनर्निर्मिती करावी, यासाठी मागील पाच वर्षांपासून मी केंद्रीय स्तरावर पाठपुरावा करत आहे. या पुनर्निर्मितीसाठी लागणारे वास्तू अवशेषात्मक पुरावे देखील उपलब्ध आहेत. मात्र भारतीय पुरातत्त्व विभाग हे ब्रिटिशांनी केलेले नियम दाखवत कोणत्याही कामास परवानगी देत नाही. भारत सरकार ब्रिटिशकालीन प्रतीकांची नावे बदलत आहे, ब्रिटिशांनी केलेले कित्येक कायदे देखील नुकतेच बदलण्यात आले. मात्र पुरातत्व विभागाचे ब्रिटिशकालीन नियम मात्र अजूनही बदलले जात नाहीत, हे दुर्दैवी आहे. माजी खासदार म्हणाले, देव दैवतांच्या मंदिरांचे पुनरुज्जीवन केले जात आहे, ही बाब कौतुकास्पदच आहे.

# जरांगे पाटील १० फेब्रुवारीपासून उपोषणाला बसणार

## सगेसोयरेसंदर्भात काढलेल्या अधिसूचनेचं कायद्यात रूपांतर व्हावं

।मुंबई।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**मराठा समाजाला आरक्षण मिळवून देण्यासाठी मनोज जरांगे पाटील गेल्या अनेक महिन्यांपासून लढा देत आहेत. सातत्याने आंदोलन आणि उपोषणं करून त्यांनी सरकारला जंग जंग पछाडलं आहे. दरम्यान, मनोज जरांगे हे लाखो मराठ्यांचा मोर्चा घेऊन मुंबईच्या वेशीवर धडकले होते. मराठा आंदोलकांनी मुंबईत चक्काजाम आंदोलन करण्याची योजना आखली होती.**



परंतु, मराठा आंदोलक मुंबईच्या वेशीवर (वाशी, नवी मुंबई) दाखल होताच राज्य सरकारने तातडीने मराठा आरक्षणाबाबत अधिसूचना काढली. त्यानुसार कुणबी नोंदी असलेल्या मराठा कुटुंबांना कुणबी जातप्रमाणपत्र देऊन त्यांचा ओबीसीत समावेश केला जाणार आहे. तसेच ओबीसीत समाविष्ट केलेल्या मराठा व्यक्तीच्या शपथपत्रावर त्यांच्या सगेसोयऱ्यांनाही जातप्रमाणपत्र देण्यास राज्य सरकारने हिरवा कंदील दाखवला आहे.दरम्यान, सगेसोयरेसंदर्भात सरकारने काढलेल्या अधिसूचनेचं कायद्यात रुपांतर व्हावं. पुढील १५ दिवसांत विशेष अधिवेशन बोलावून हा कायदा पारीत करावा अशी मागणी मनोज जरांगे पाटील यांनी केली आहे. त्यानंतर उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, मराठ्यांना सरसकट आरक्षण मिळालेलं नाही. त्यावरून जरांगे पाटील यांनी मंगळवारी (३० जानेवारी) राज्य सरकारला इशारा दिला होता की, उद्यापासून या अधिसूचनेची अंमलबजावणी सुरू केली नाही तर १० फेब्रुवारीपासून मी बेमुदत उपोषणाला बसेन. दरम्यान, राज्य सरकारने अद्याप या अधिसूचनेची अंमलबजावणी करण्यास सुरुवात केलेली नाही. त्यामुळे मनोज जरांगे पाटील येत्या १० फेब्रुवारीपासून बेमुदत उपोषणाला बसणार आहेत.मनोज जरांगे पाटील यांनी काल (३० डिसेंबर) किल्ले रायगडावर जाऊन छत्रपती शिवाजी महाराजांना अभिवादन केलं. त्यानंतर प्रसारमाध्यमांशी बातचीत केली. त्यावेळी म्हणाले, “या कायद्याची अंमलबजावणी वेळेत केली नाही किंवा दडपणाखाली जबाबदारी पार पाडली नाही तर आम्हाला पुन्हा अडचणीचे दिवस यायला नको. नोंदी मिळत नाहीत, समितीला मुदतवाढ दिलेली असतानाही समिती काम करत नाही.

### 10 फेब्रुवारीच्या आत गुन्हे मागे घ्यावे

» ज्यांची कुणबी नोंद मिळाली आहे त्यांना प्रमाणपत्र वाटप होणं आवश्यक आहे. त्यामुळे आपण १० फेब्रुवारीचा निर्णय घेतलेला आहे. मनोज जरांगे पाटील म्हणाले, सरकारने अधिसूचना काढून चार दिवस उलटले तरी आंतरवाली सराटीसह महाराष्ट्रातील मराठा बांधवांवरील गुन्हे मागे घेतलेले नाहीत. तुम्ही तत्काळ शब्द वापरला आहे. सरकारमधील मंत्र्यांकडून वेगवेगळी वक्तव्ये येत आहेत. त्यामुळे सरकारची भूमिका आम्हाला कळत नाही. १० फेब्रुवारीच्या आत गुन्हे मागे घ्यावे.

# सोरेन यांना ईडीकडून अटक!

## मुख्यमंत्रीपदाचा राजीनामा ; राजकारणात उलथापालथी

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**हेमंत सोरेन यांनी आपल्या मुख्यमंत्रीपदाचा राजीनामा दिल्यानंतर त्यांना ईडीने अटक केल्याची माहिती आहे. हेमंत सोरेन यांना हाऊस अरेस्ट केलं असून त्यामुळे झारखंडच्या राजकारणात मोठ्या उलथापालथी घडताना दिसत आहेत. हेमंत सोरेन यांच्यानंतर आता झारखंडची कमान ही चंपई सोरेन यांच्याकडे सोपवण्यात आली आहे.**



झारखंडमधील कथित जमीन घोटाळ्याशी संबंधित मनी लाँड्रिंग प्रकरणात ईडीने हेमंत सोरेन यांची चौकशी केली. यानंतर हेमंत सोरेन मुख्यमंत्रिपदाचा राजीनामा देण्यासाठी राजभवनात पोहोचले. दरम्यान, सत्ताधारी पक्षाचे आमदारही रांची येथील राजभवनात पोहोचले. चंपई सोरेन यांनी राज्यपालांची भेट घेऊन सरकार स्थापनेचा दावा केल्याचे सांगण्यात येत आहे. चंपई सोरेन यांना 41 हून अधिक आमदारांचा पाठिंबा आहे. 80 सदस्यीय विधानसभेत बहुमताचा आकडा 41 आहे.हेमंत सोरेन यांना अटक होणार हे निश्चित झाल्यानंतर त्यांनी त्यांच्या पत्नी कल्पना सोरेन यांच्याकडेम मुख्यमंत्रिपदाची सूत्रं देण्यासाठी हालचाल सुरू केली. पण हेमंत सोरेन यांचे लहान बंधू आणि हेमंत सोरेन यांच्या मोठ्या भावाची पत्नी सीता सोरेन यांच्या विरोधामुळे कल्पना सोरेन मुख्यमंत्री बनू शकल्या नाहीत असं सांगण्यात येतंय. ईडीनं रांचीमध्ये लष्कराच्या ताब्यात असलेल्या 4.55 एकर जमिनीच्या बेकायदेशीर खरेदी-विक्रीची चौकशी सुरू केली आहे. या प्रकरणी ईडीनं रांचीच्या बडागाईन झोनचे महसूल उपनिरीक्षक भानू प्रताप प्रसाद यांना अटक केली होती. त्यांच्या राहत्या घरातून मोठ्या प्रमाणात सरकारी कागदपत्रं आणि मोबाईलही त्यावेळी जप्त करण्यात आले होते. त्यानंतर ईडीने आपला मोर्चा हेमंत सोरेन यांच्याकडे वळवला. प्रदीप बागची, विष्णू कुमार अग्रवाल, भानू प्रताप प्रसाद आणि इतरांविरुद्ध झारखंड पोलीस आणि पश्चिम बंगाल पोलिसांनी दाखल केलेल्या अनेक एफआयआरच्या आधारे ईडीनं मनी लॉन्ड्रिंग कायद्याच्या कलमांखाली गुन्हा नोंदवला. या प्रकरणाचा तपास पुढे जात असताना ईडीनं आतापर्यंत 14 आरोपींना अटक केली आहे. या आरोपींनी सरकारी अधिकाऱ्यांच्या संगनमतानं भूमाफियांच्या नावे फसवणूक करून भूखंड हस्तांतरित केल्याचं तपासात उघड झालंय. अटक करण्यात आलेल्या 14 आरोपींमध्ये प्रदीप बागची, अफसर अली, सद्दाम हुसेन, इम्तियाज अहमद, तल्हा खान, फैयाज खान, भानू प्रताप प्रसाद, छवी रंजन, आयएएस (माजी डीसी रांची) दिलीप कुमार घोष, अमित कुमार अग्रवाल, विष्णू कुमार अग्रवाल यांचा समावेश आहे. जमीन घोटाळ्याप्रकरणी केंद्रीय तपास यंत्रणेनं आतापर्यंत 236 कोटी रुपयांपेक्षा जास्त किमतीची मालमत्ता जप्त केली आहे.ईडीने रांचीमध्ये लष्कराच्या ताब्यात असलेल्या ४.५५ एकर जमिनीच्या बेकायदेशीर खरेदी-विक्रीची चौकशी सुरू केली. या प्रकरणी ईडीनं रांचीच्या बडागाईन झोनचे महसूल उपनिरीक्षक भानू प्रताप प्रसाद यांना अटक केली होती. त्यांच्या राहत्या घरातून मोठ्या प्रमाणात सरकारी कागदपत्रं आणि मोबाईलही त्यावेळी जप्त करण्यात आले होते. त्यानंतर ईडीने आपला मोर्चा हेमंत सोरेन यांच्याकडे वळवला. प्रदीप बागची, विष्णू कुमार अग्रवाल, भानू प्रताप प्रसाद आणि इतरांविरुद्ध झारखंड पोलीस आणि पश्चिम बंगाल पोलिसांनी दाखल केलेल्या अनेक एफआयआरच्या आधारे ईडीनं मनी लॉन्ड्रिंग कायद्याच्या कलमांखाली गुन्हा नोंदवला. या प्रकरणाचा तपास पुढे जात असताना ईडीनं आतापर्यंत १४ आरोपींना अटक केली आहे. या आरोपींनी सरकारी अधिकाऱ्यांच्या संगनमतानं भूमाफियांच्या नावे फसवणूक करून भूखंड हस्तांतरित केल्याचं तपासात उघड झालं आहे.हेमंत सोरेन यांनी आपल्या मुख्यमंत्रीपदाचा राजीनामा दिल्यानंतर त्यांना ईडीने अटक केल्याची माहिती आहे. हेमंत सोरेन यांना हाऊस अरेस्ट केलं असून त्यामुळे झारखंडच्या राजकारणात मोठ्या उलथापालथी घडताना दिसत आहेत. हेमंत सोरेन यांच्यानंतर आता झारखंडची कमान ही चंपई सोरेन यांच्याकडे सोपवण्यात आली आहे.

### झारखंडमध्ये राजकीय संकट निर्माण

झारखंडचे माजी मुख्यमंत्री हेमंत सोरेन यांना अटक करण्यात आली आहे. आज ईडीने हेमंत सोरेन यांना चौकशीसाठी बोलवलं होतं. त्यांची चौकशी पूर्ण झाल्यानंतर त्यांना अटक करण्यात आली आहे. जमीन घोटाळा प्रकरणात आज हेमंत सोरेन यांची चौकशी करण्यात आली. काही तासांच्या चौकशीनंतर हेमंत सोरेन यांना अटक करण्यात आली आहे. त्यांनी काही वेळापूर्वीच त्यांचा राजीनामा राज्यपालांकडे सुपूर्द केला. त्यानंतर हेमंत सोरेन यांच्यावर ही कारवाई करण्यात आली. या कारवाईमुळे झारखंडमध्ये राजकीय संकट निर्माण झालं आहे. इंडियन एक्स्प्रेसने याविषयीचं वृत्त दिलं आहे.झारखंडमधील जमीन घोटाळ्याशी संबंधित आर्थिक गैरव्यवहार प्रकरणात ईडीने हेमंत सोरेन यांची चौकशी ईडीकडून करण्यात आली. यानंतर हेमंत सोरेन मुख्यमंत्रिपदाचा राजीनामा देण्यासाठी राजभवनात पोहोचले. दरम्यान, सत्ताधारी पक्षाचे आमदारही रांची येथील राजभवनात पोहोचले. चंपई सोरेन यांनी राज्यपालांची भेट घेऊन सरकार स्थापनेचा दावा केल्याचे सांगण्यात येतं आहे. चंपई सोरेन यांना ४१ हून अधिक आमदारांचा पाठिंबा आहे. ८० सदस्यीय विधानसभेत बहुमतासाठीची मॅजिक फिगर ४१ आहे.

# अखिलेश यादवांकडून थेट 16 उमेदवार जाहीर!

## महाविकास आघाडी आणि प्रकाश आंबेडकरांचं गुऱ्हाळ संपता संपेना

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**पलटूराम नितीशकुमार, ममता दिदींचा स्वबळाचा नारा यामुळे इंडिया आघाडीत बिघाडी झाली असतानाच आता राज्यातही प्रकाश आंबेडकर यांच्या समावेशावरून महाविकास आघाडीत अजूनही ताळमेळ जमलेला नाही. प्रकाश आंबेडकर यांचा ताठर स्वभाव सुद्धा तितकाच कारणीभूत ठरत आहे. आजही प्रकाश आंबेडकर आपली ताठर भूमिका घेताना नाना पटोलेंवरील रोख कायम ठेवला.**

तर अजूनही महाविकास आघाडीचा भाग नसल्याचे जाहीर केले. त्यामुळे आंबेडकरांच्या मनात आहे तरी काय? असाही प्रश्न उपस्थित झाला आहे.दुसऱ्या बाजूला महाविकास आघाडीतील जागावाटपाचे घोडे अजूनही अडले आहेत. दुसरीकडे, उत्तर प्रदेशात समाजवादी पक्षाकडून थेट 16 उमेदवार जाहीर करण्यात आले आहेत. समाजवादी पक्षाची पहिल्या यादीत एकाही ब्राह्मण किंवा वैश्य समाजातून तिकीट दिलेलं नाही. पक्षाच्या पहिल्या यादीत 11 ओबीसी, 1 मुस्लिम, 1 दलित, 1 ठाकूर, 2 खत्री यांचा समावेश आहे. 11 ओबीसी तिकिटांमध्ये 4 कुर्मी, 3 यादव, 2 शाक्य, 1 निषाद आणि 1 पाल आहेत. यादवांमधील उमेदवारी यादव कुटुंबातील आहे. दरम्यान, सर्वात आश्चर्यकारक बाब म्हणजे अखिलेश यादव यांनी 94 वर्षीय डॉ. शफीकुर रहमान बरक यांनाही उमेदवारी दिली आहे.



शफीकुर रहमान संभल लोकसभा मतदारसंघातून निवडणूक लढवणार आहेत. शफीकुर रहमान अजूनही सपाचे खासदार आहेत. शफीकुर रहमान हे पाच वेळा खासदार आणि उत्तर प्रदेशच्या राजकारणातील एक मोठे नाव आहे. गेल्या लोकसभा निवडणुकीत भाजपने विक्रमी विजय मिळवला होता आणि उत्तर प्रदेशात 80 पैकी 62 जागा जिंकल्या होत्या, तेव्हाही शफीकुर रहमान यांनी भाजपच्या उमेदवाराचा दारूण पराभव केला होता.

### शफीकुर रहमान 5 वेळा खासदार

पुन्हा एकदा शफीकुर रहमानवर विश्वास व्यक्त केला आहे. 2019 च्या लोकसभा निवडणुकीतही समाजवादी पक्षाने शफीकुर रहमान यांना संभल मतदारसंघातून उमेदवारी दिली होती. येथे त्यांची स्पर्धा भाजपच्या परमेश्वर लाल सैनी यांच्याशी होती. शफीकुर रहमान 5 वेळा खासदार राहिले आहेत. तथापि, मधल्या काळात त्यांनी बहुजन समाज पक्षात (बसपा) प्रवेश केला, परंतु लवकरच ते सपामध्ये परतले. शफीकुर रहमान सुरुवातीपासूनच समाजवादी पक्षासोबत आहेत. मुरादाबादमधून तीन वेळा आणि संभल लोकसभा मतदारसंघातून दोनदा निवडणूक जिंकली. 1996, 1998 आणि 2004 मध्ये त्यांनी सपाच्या तिकिटावर दणदणीत विजय मिळवला, पण 2009 मध्ये ते सपा सोडून बसपमध्ये दाखल झाले होते.

# रामानंद सागर यांची 'रामायण' मालिका पुन्हा येणार!

22 जानेवारीला अयोध्येत (AYODHYA) प्रभू श्रीरामाच्या मंदिराचा उद्घाटन सोहळा पार पडला. राम मंदिराच्या उद्घाटन सोहळ्याला 'रामायण' या लोकप्रिय मालिकेतील प्रभू श्री रामाची भूमिका साकारणाऱ्या अरुण गोविल (ARUN GOVIL) यांनी तसेच सीता मातेची भूमिका साकारणाऱ्या दीपिका चिखलिया (DIPIKA CHIKHLIA), लक्ष्मण ही भूमिका साकारणारे अभिनेते सुनील लाहिरी (SUNIL LAHRI) यांनी हजेरी लावली होती. 'रामायण' या मालिकेला प्रेक्षकांची विशेष लोकप्रियता मिळाली. आता ही मालिका पुन्हा प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. 'रामायण' कोणत्या चॅनलवर टेलिकास्ट होणार आहे? याबाबत जाणून घेऊयात...'रामायण' ही मालिका डीडी नॅशनलवर प्रसारित होणार आहे. नुकतीच याबाबत दूरदर्शन नॅशनल (डीडी नॅशनल) या चॅनलवर माहिती देण्यात आली आहे. दूरदर्शनने त्याच्या अधिकृत X (पूर्वीचे ट्विटर) हँडलवर घोषणा केली की, रामानंद सागर यांची 'रामायण' ही मालिका पुन्हा छोट्या पडद्यावर येणार आहे. दूरदर्शनने एक व्हिडीओ शेअर करुन कॅप्शनमध्ये लिहिलं, 'पुन्हा एकदा धर्म, प्रेम आणि दानाची अलौकिक पौराणिक कथा प्रेक्षकांच्या भेटीला



येत आहे... संपूर्ण भारतातील सर्वात लोकप्रिय शो 'रामायण' लवकरच येत आहे, लवकरच डीडी नॅशनलवर रामायण पाहा."रामायण मालिका पुन्हा प्रेक्षकांच्या भेटीला येणार असल्यानं आता प्रेक्षकांना आनंद झाला आहे. दूरदर्शनने शेअर केलेल्या व्हिडीओला कमेंट केली 'खूप चांगला निर्णय. कृपया प्रसारणाची वेळ आणि तारीख सांगा." अनेक नेटकऱ्यांनी 'जय श्री राम' अशी कमेंट केली आहे. रामायण या मालिकेची वेळ आणि तारिख यांची माहिती अजून दूरदर्शनने दिलेली नाही.रामानंद सागर यांची रामायण ही मालिका 1987 मध्ये प्रसारित झाली होती. लॉकडाऊनमध्ये देखील ही मालिका प्रेक्षकांच्या भेटीला येत होती. 'रामायण' मालिकेतील संगीत लोक आजही आवडीनं ऐकतात. या मालिकेला संगीत रवींद्र जैन यांनी दिले आहे. आता 'रामायण' ही मालिका पुन्हा छोट्या पडद्यावर पाहण्यास प्रेक्षक उत्सुक आहेत.

## फारुकीच्या चाहत्याविरोधात एफआयआर दाखल

छोट्या पडद्यावरील बिग बॉस 17या कार्यक्रमाचा विजेता मुनव्वर फारुकी हा ठरला. मुनव्वर हा बिग बॉसची ट्रॉफी घेऊन डोंगरीमध्ये गेला होता. डोंगरीमधील मुनव्वरचे फोटो आणि व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाले आहेत. आता मुनव्वरच्या एका चाहत्याच्या विरोधात एफआयआर दाखल करण्यात आला आहे. मुनव्वर फारुकीच्या रोड शोदरम्यान त्याच्या एका चाहत्याने बेकायदेशीरपणे ड्रोनचा वापर केला. परवानगीशिवाय रोड शोमध्ये ड्रोन कॅमेरा आणल्याप्रकरणी मुनव्वरच्या चाहत्याविरोधात एफआयआर दाखल करण्यात आला आहे.मुनव्वर फारुकीच्या चाहत्याविरुद्ध एफआयआर दाखल करण्यात आला आहे. रिपोर्टनुसार, मुंबई पोलिसांनी मुनव्वरचा चाहता अरबाज युसूफ खानच्या नावावर एफआयआर नोंदवला आहे.

## क्रितीच्या रोमान्सची चर्चा

बॉलिवूड अभिनेता शाहिद कपूर आणि कृती सेनन सध्या त्यांच्या 'तेरी बातों में ऐसा उलझा जिया' या सिनेमामुळे चर्चेत आहेत. या सिनेमात शाहिद आणि कृती यांच्या दरम्यान लव्हस्टोरी दाखवण्यात येणार आहे. सिनेमात कृती एका फिमेल रोबोटची भूमिका साकारणार आहे. शाहिद आणि कृतीचा 'तेरी बातों में ऐसा उलझा जिया' हा सिनेमा 9 फेब्रुवारी रोजी प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. दरम्यान, निर्मात्यांनी 'तेरी बातों में ऐसा उलझा जिया' या सिनेमाचे टायटल ट्रॅक रिलीज झालं आहे. टायटल ट्रॅक निर्मात्यांनी रिलीज केले आहे. या गाण्याला टी सिरीजने युट्युब चॅनेलवर प्रेक्षकांच्या भेटीला आणले आहेत. टायटल ट्रॅकमध्ये शाहिद कपूर आणि कृती सेनन रोमान्स करताना दिसत आहेत. दोघांची केमिस्ट्री प्रेक्षकांच्या पसंतीस उतरली आहे. आत्तापर्यंत या गाण्याला 6 मिलीयन पेक्षा जास्त लोकांनी पाहिले आहे. शाहिद आणि कृतीच्या 'तेरी बातों में ऐसा उलझा जिया' या सिनेमाच टायटल ट्रॅक युट्युबवर ट्रेंड होत आहे. त्यामुळे टायटल ट्रॅकच्या तुफान चर्चा रंगल्या आहेत. 'तेरी बातों में ऐसा उलझा जिया' या सिनेमात शाहिद कपूर मुख्य भूमिका साकारणार आहे. सिनेमात शाहिद एक रोबोटिक्स इंजिनिअर आहे. त्यामुळे त्याची भूमिका कृत्रीम बुद्धिमत्ता म्हणजेच एआय भोवती फिरताना दिसणार आहे.



## सम्राट आणि कृती खरबंदाचा साखरपुडा?

बॉलिवूड अभिनेता पुलकित सम्राट आणि कृती खरबंदा सध्या एकमेकांना डेट करताना दिसत आहे. पुलकित आणि कृती अनेकदा एकत्रित स्पॉट झाल्या आहेत. दोघेही नेहमी प्रेम व्यक्त करताना मागे पुढे पाहत नाहीत. पुलकित सम्राट आणि खरबंदा नेहमीच चर्चेत असतात. दरम्यान आता दोघांबाबत एक मोठी बातमी समोर आली आहे. दोघांनी साखरपुडा उरकला असल्याचे बोलले जात आहे. पुलकित सम्राट आणि खरबंदा यांची काही फोटो सोशल मीडियावर तुफान व्हायरल झाले आहेत. या फोटोंमध्ये दोघेही रिंग घातलेली दिसत आहे. दरम्यान, दोघांनी आता साखरपुडा उरकला असल्याचे बोलले जात आहे. मात्र, दोघांपैकी कोणीही अद्याप याला दुजोरा दिलेला नाही. रिया लथूरा या इन्स्टाग्राम अकाऊंटवरुन काही फोटो शेअर करण्यात आले आहेत. या फोटोंमध्ये पुलकित आणि खरबंदा इतर काही लोकांसमवेत दिसत आहेत. पुलकित सम्राट आणि कृतीने नुकतेच त्यांच्या मित्राच्या घरी हा सोहळा आयोजित केला होता. या खास दिवसाची दोघांनी जंगी तयारी केली होती. अभिनेत्री कृती खरबंदा आणि पुलकित सम्राट यांच्या नात्याबाबत चर्चा सुरु आहेत. सोशल मीडियावर त्यांच्या साखरपुड्याबाबत चर्चा सुरु झाल्याने चाहते आनंदी होताना दिसत आहेत. याशिवाय दोघांनीही अनेक सिनेमांत देखील काम केले आहे. दोघांचे एकत्रित फोटो तुफान व्हायरल झाले आहेत. पुलकितच्या बॉलिवूडमधील कामाबाबत बोलायचे झाले तर नुकताच त्याचा 'फुकरे 3' रिलीज झाला होता. तर कृतीचा 'रिस्की रोमियो' हा सिनेमा प्रेक्षकांच्या भेटीला आला होता. अभिनेत्री कृती खरबंदा आणि पुलकित सम्राट यांनी एकत्रितपणे अनेक सिनेमे केले आहेत. 'वीरे द वेडिंग' आणि 'पागलपंती' यांसारख्या सिनेमांमधून ते प्रेक्षकांच्या भेटीला आले आहेत. दोघांची लवस्टोरी सिनेमांच्या सेटवरुनच सुरु झाली आहे.

## फायटरचा बॉक्स ऑफिसवर धमाका सुरुच

सिद्धार्थ आनंदच्या फायटरने बॉक्स ऑफिसवर 240 कोटींचा टप्पा पार केलाय. जगभरातील प्रेक्षकांचा सिनेमाला तुफान प्रतिसाद मिळत आहे. बॉक्स ऑफिसच्या अहवालांनुसार, फायटरच्या दमदार पदार्पणानंतर त्याने बॉक्स ऑफिसवर बक्कळ कमाई केली आहे. चित्रपटाची आकर्षक कथा प्रेक्षकांना मोहित करून गेली आहे. देशांतर्गत कलेक्शन 132 कोटींच्या पुढे गेलं असून आंतरराष्ट्रीय दर्शकांसोबततही चित्रपटाला 240 कोटींचा टप्पा पार केलाय.सिद्धार्थ आनंद दिग्दर्शित केलेल्या फायटरमध्ये अभिनेत हतिक रोशन, दीपिका पदुकोण आणि अनिल कपूर प्रमुख भूमिकेत आहेत.आणि संयुक्त विद्यमाने सिनेमाची निर्मिती करण्यात आली आहे. फायटरमध्ये ) नौदलाच्या समर्पणाबाबत आणि त्यागाबाबत भाष्य करण्यात आले आहे. 26 जानेवारीच्या पूर्वसंध्येला देशभक्तीवर आधारित सिनेमा रिलीज झाला होता. फायटरच्या पत्रकार परिषदेतील आणि स्क्रीनिंगचे फोटो सोशल मीडियावर तुफान व्हायरल झाले होते. सिद्धार्थ आनंदचा पठाण हा सिनेमा गेल्या वर्षी प्रेक्षकांच्या भेटीला आला होता. सिनेमानी बॉक्स ऑफिसवर बक्कळ कमाई केली होती. दीपिकाच्या बिकनीमुळे पठाण वादाच्या भोवऱ्यातही सापडला होता. पठाणनंतर आता फायटर देखील बंप्पर कमाई करताना दिसत आहे. अभिनेता हृतिक रोशन आणि अभिनेत्री दीपिका पादुकोण यांचा 'फायटर' हा सिनेमा प्रेक्षकांच्या पसंतीस उतरलाय. रिलीजच्या पहिल्या आठवड्यातच या सिनेमाने 100 कोटींचा टप्पा पार केला होता 'फायटर'ला प्रेक्षकांचा सकारात्मक प्रतिसाद मिळत आहे.



# दुसऱ्या कसोटीपूर्वी भारतासमोर पेच!

## » कसोटी सामन्यासाठी संघ निवडीची डोकेदुखी वाढली

नवी दिल्ली । । वृत्तसंस्था

**पहिल्या कसोटी क्रिकेट सामन्यातील पराभवानंतर भारतीय संघात बदल केले गेले असले, तरी रवींद्र जडेजा आणि के.एल. राहुल यांच्या दुखापतीमुळे संघ व्यवस्थापनासमोर दुसऱ्या कसोटी सामन्यासाठी संघ निवडीची डोकेदुखी वाढली आहे. हैदराबाद कसोटी सामन्यात पहिल्या डावात राहुल आणि जडेजाचे योगदान महत्त्वाचे होते. पण, दुसऱ्या डावात भारताची सगळीच गणिते चुकली. प्रमुख अस्त्र असलेली फिरकी गोलंदाजी चालली नाही आणि आघाडीच्या फलंदाजांनीही आपल्या गुणवत्तेला न्याय दिला नाही. अशातच एकेरी धाव पळताना जडेजाचे स्नायू दुखावले, तर राहुलची मांडी दुखावल्यामुळे दोघेही दुसऱ्या कसोटी सामन्यातून बाहेर पडले.**



‘बॅझबॉल’ नियोजनासमोर आधीच गडबडून गेलेल्या भारतीय संघ व्यवस्थापनासमोर या दोघांच्या अनुपलब्धतेमुळे चिंतेची भर पडली आहे. जडेजाची अष्टपैलू उपयुक्तता आणि राहुलची भरवशाची फलंदाजी अशा दोन्ही आघाडयांवर भारताला आता नवा शोध घ्यावा लागणार आहे. विराट कोहलीने यापूर्वीच दोन कसोटी सामन्यांतून माघार घेतली आहे. या सगळया रिकाम्या जागा भरण्यासाठी निवड समितीने कर्णधार रोहित शर्मा आणि प्रशिक्षक राहुल द्रविड यांच्या समोर सर्फराज खान, सौरभ कुमार, वॉशिंग्टन सुंदर असे पर्याय उपलब्ध करून दिले आहेत. सर्फराजचा भारतीय संघात शिरकाव झाला असला, तरी सध्याच्या स्थितीत राहुलची जागा घेण्यासाठी रजत पाटीदारचे पारडे जड आहे. पाटीदारला विराटच्या माघारीनंतर पहिल्या कसोटी सामन्यादरम्यानच संघात स्थान देण्यात आले होते. त्याचवेळी फिरकीसाठी जडेजाची जागा कुलदीप घेऊ शकतो. त्यामुळे अश्विन, अक्षर पटेलबरोबर तिसऱ्या फिरकी गोलंदाजीचा प्रश्न सोडवला जाऊ शकतो. एकूणच नव्या खेळाडूंचा संघात समावेश करण्यात आला असला, तरी अंतिम अकरामध्ये यापूर्वी संघात स्थान मिळालेल्या खेळाडूंना प्राधान्य मिळू शकते.अंतिम अकरा खेळाडूंमध्ये बदल करायचा झालाच तर, संघ व्यवस्थापन चार फिरकी गोलंदाजांसह खेळू शकते. यासाठी मोहम्मद सिराजला वगळून कुलदीपला संधी दिली जाऊ शकते. त्याचवेळी सर्फराज खान किंवा वॉशिंग्टन सुंदर यांच्यापैकी एकाचा विचार करू शकते. जडेजाप्रमाणे डावखुरा फिरकी गोलंदाज असणारा सौरभ कुमार फलंदाजीही चांगली करू शकत असल्यामुळे त्याचाही विचार केला जाऊ शकतो. एकूणच संघ व्यवस्थापनाची स्थिती आता तरी गोंधळलेली दिसत आहे.दुसरा कसोटी सामना विशाखापट्टणम येथे होणार असून, येथील खेळपट्टी किमान पहिल्या डावात तरी फलंदाजांसाठी अनुकूल राहिली आहे. आतापर्यंत येथे दोन कसोटी सामने झाले असून २०१९ मध्ये भारताने दक्षिण आफ्रिकेविरुद्ध पहिल्या डावात ५०२ धावांचा डोंगर उभा केला होता. मयांक अगरवालने दुहेरी शतक, तर रोहितने १७६ धावांची खेळी केली होती. त्यामुळे जडेजाच्या जागी संघ व्यवस्थापन निश्चितपणे अष्टपैलू किंवा निव्वळ फलंदाजाचा विचार करू शकेल. गोंधळलेल्या अवस्थेत संघ व्यवस्थापन इंग्लंडचे फलंदाज ज्या पद्धतीने पहिल्या कसोटीत खेळले ते बघता भारतात येताना ते ठोस अशा योजना घेऊन आले आहेत. यात त्यांनी पहिल्या कसोटीत तरी काही बदल केले नाहीत. ‘स्वीप’ फटक्याचा मुक्त वापर करून त्यांनी भारतीय फिरकी गोलंदाजीवर दडपण आणले. त्यामुळे भारतीय संघ व्यवस्थापनाने आत्मपरीक्षण करून फिरकी गोलंदाजी खेळण्याच्या दृष्टिकोनात बदल करण्याची गरज असल्याचाच धडा पहिल्या कसोटी सामन्याच्या निकालाने दिला आहे.इंग्लंडच्या ‘बॅझबॉल’ नियोजनासमोर आधीच गडबडून गेलेल्या भारतीय संघ व्यवस्थापनासमोर या दोघांच्या अनुपलब्धतेमुळे चिंतेची भर पडली आहे. जडेजाची अष्टपैलू उपयुक्तता आणि राहुलची भरवशाची फलंदाजी अशा दोन्ही आघाडयांवर भारताला आता नवा शोध घ्यावा लागणार आहे.

### जडेजाची जागा कुलदीप घेऊ शकतो

» विराट कोहलीने यापूर्वीच दोन कसोटी सामन्यांतून माघार घेतली आहे. या सगळया रिकाम्या जागा भरण्यासाठी निवड समितीने कर्णधार रोहित शर्मा आणि प्रशिक्षक राहुल द्रविड यांच्या समोर सर्फराज खान, सौरभ कुमार, वॉशिंग्टन सुंदर असे पर्याय उपलब्ध करून दिले आहेत. सर्फराजचा भारतीय संघात शिरकाव झाला असला, तरी सध्याच्या स्थितीत राहुलची जागा घेण्यासाठी रजत पाटीदारचे पारडे जड आहे. पाटीदारला विराटच्या माघारीनंतर पहिल्या कसोटी सामन्यादरम्यानच संघात स्थान देण्यात आले होते. त्याचवेळी फिरकीसाठी जडेजाची जागा कुलदीप घेऊ शकतो.

# किंग कोहलीनं ब्रेक नेमका कशासाठी घेतला?

## » रोहित शर्मासह इतर खेळाडूंवर अनेक जबाबदाऱ्या वाढणार आहेत

।नवी दिल्ली ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**टीम इंडियाचा किंग कोहली इंग्लंडविरुद्धच्या पहिल्या दोन कसोटीतून तडकाफडकी माघार घेतल्यानंतर सुरु झालेली चर्चा अजूनही कायम आहे. एका बाजू रामललाच्या प्राणप्रतिष्ठा सोहळ्यासाठी राजा कोहलीलाही निमंत्रित करण्यात आले होते, मात्र तो तिथं सुद्धा पोहोचला नाही. त्यामुळे सर्वांनाच आश्चर्याचा धक्का बसला आहे.**



कोहलीने माघार घेतल्यानंतर बीसीसीआयने वैयक्तिक कारणांमुळे विराट कोहली इंग्लंडविरुद्धच्या पहिल्या दोन कसोटी सामन्यांसाठी भारतीय संघातून माघार घेतल्याचे सांगितले होते. त्यामुळे किंग कोहलीच्या अचानक माघारीने सोशल मीडियावर अनेक अफवा पसरल्या. अलीकडेच विराट त्याच्या आईच्या प्रकृती अस्वास्थ्यामुळे हैदराबाद कसोटीतून बाहेर असल्याची बातमी आली होती. आता कोहलीच्या भावाने ही बातमी खोटी ठरवत आईची तब्येत पूर्णपणे ठीक असल्याचे सांगितले. विराट कोहलीच्या भावाने इंस्टाग्राम अकाऊंटवर एक पोस्ट शेअर केली असून त्याची आई सरोज कोहली यांची प्रकृती ठीक असल्याचे सांगितले आहे. त्यांनी आईच्या तब्येतीच्या बातम्या खोट्या असल्याचं म्हटलं आहे. खोट्या अफवांवर विश्वास ठेवू नका, असे आवाहनही केले आहे.विराट भारतीय संघासाठी इंग्लंडविरुद्ध पहिला कसोटी सामना खेळू शकला नव्हता, ज्यामध्ये टीम इंडियाला 28 धावांनी पराभव स्वीकारावा लागला होता. आता दुसरा कसोटी सामना 2 फेब्रुवारीपासून खेळवला जाणार आहे. दुसरीकडे, अष्टपैलू रवींद्र जाडेजा आणि केएल राहुल दुखापतीमुळे दुसऱ्या कसोटीतून बाहेर पडले आहेत. अशा परिस्थितीत रोहित शर्माच्या नेतृत्वाखालील भारतीय क्रिकेट संघाच्या अडचणी वाढल्या आहेत. दुसरा कसोटी सामन्यात टीम इंडियाला चार दिग्गजांशिवाय खेळावं लागणार आहे. त्यामुळे दुसऱ्या कसोटीत पुनरागमन करणं फार कठीण जाणार आहे. चौघांच्याही अनुपस्थितीत रोहित शर्मासह इतर खेळाडूंवर अनेक जबाबदाऱ्या वाढणार आहेत. विशाखापट्टणम कसोटीत भारतीय क्रिकेट संघ रविचंद्रन अश्विन, अक्षर पटेल आणि वॉशिंग्टन सुंदर/ कुलदीप यादव या तीन फिरकी गोलंदाजांसह मैदानात उतरू शकतो.

### आईची तब्येत पूर्णपणे ठीक

» कोहलीने माघार घेतल्यानंतर बीसीसीआयने वैयक्तिक कारणांमुळे विराट कोहली इंग्लंडविरुद्धच्या पहिल्या दोन कसोटी सामन्यांसाठी भारतीय संघातून माघार घेतल्याचे सांगितले होते. त्यामुळे किंग कोहलीच्या अचानक माघारीने सोशल मीडियावर अनेक अफवा पसरल्या. अलीकडेच विराट त्याच्या आईच्या प्रकृती अस्वास्थ्यामुळे हैदराबाद कसोटीतून बाहेर असल्याची बातमी आली होती. आता कोहलीच्या भावाने ही बातमी खोटी ठरवत आईची तब्येत पूर्णपणे ठीक असल्याचे सांगितले. विराट कोहलीच्या भावाने इंस्टाग्राम अकाऊंटवर एक पोस्ट शेअर केली असून त्याची आई सरोज कोहली यांची प्रकृती ठीक असल्याचे सांगितले आहे.